# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/12/2022 (गुरूवार) सकाळ


---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा दाखल

**पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत कन्हान नदीच्या पात्रात रोहणा गावाच्या पाठीमागे येथे दिनांक ०६/१२/२०२२ चे २१.५४ वा. ते २२.४५ वा. दरम्यान फिर्यादी यांना गोपणीय मुखबीरव्दारे मिळालेल्या खबरेवरून नाकाबंदी केली असता यातील आरोपी नामे- १) इल्लु अंसारी २) एक अनोळखी ट्रॅक्टर चालक यांनी संगनमत करून रोहना गावाच्या पाठीमागे असलेल्या कन्हान नदीच्या पात्रातुन ट्रॅक्टर मधुन रेती चोरी करीत आहे. अशा मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन खापरखेडा येथील पोलीस पथकासह रोहणा गावाकडे जात असताना रोहणा बस स्थानकाजवळ वडाच्या झाडाजवळ आरोपी इल्लु अंसारी हा रेतीच्या ट्रॅक्टर मधुन रेती खाली करताना दिसुन आल्याने आरोपी इल्लु अंसारी हा पोलीसांना पाहताच अंधारात पळुन गेला. त्याचा पाठलाग केला असता तो मिळुन आला नाही. सदर ट्रॅक्टर हा सोनालिका कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व विना क्रमांकाची ट्रॉली किंमती अंदाजे ५,००,०००/-रू. ट्रॅक्टर मध्ये अवैधपणे एक ब्रास रेती किंमती अंदाजे १०,०००/-रू. ची चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण ५,१०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे- पोलीस उपनिरीक्षक सुर्यप्रकाश लालसाप्रसाद मिश्रा, पोलीस स्टेशन खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. दिपक कॉक्रेंटवार पोस्टे खापरखेडा मो. नं. ८३२९६६६६७८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**